ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

# विधवापुनर्विवाह आणि भारतरत्न धोंडो केशव कर्वे यांचे कार्य

**प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन**
*मराठी विभाग प्रमुख*
*श्रीसिद्धीविनायक महिला महाविद्यालय, कर्वेनगर पुणे- ५२*
*ईमेल आयडी: dr.shailesh.tribhuwan@gmail.com*

**सारांश**

*प्रस्तुत शोधनिबंधात प्राचीन ,मध्ययुगीन ,शिवशाही व पेशवाई कालखंड, ब्रिटीशांचा कालखंड,आणि स्वातत्र्यांनंतरचा कालखंड आणि आता आताचा आधुनिक ,जागतिकीकरणाचा ,संगणक युगाचा या कालखंडातील विधवा विवाह संबंधी चर्चा केली आहे .जो प्रश्न भृणहत्या,विवाह वय, बालविवाहाच्या समस्येपासून सुरु झाला तो पुढे बाला – जरठ विवाह ,सतीप्रथा, विधवापुनर्विवाह , विवाह संमती कायदा आणि विधवा विवाह अशा वेगवेगळ्या स्थित्यंतरे घेत सोडवला गेला आहे आणि आजही पूर्णत: सुटलेला आहे असे नाही. या सर्व स्थित्यतरात भारतरत्न महर्षी धोंडो कर्वे यांचे स्त्री उद्धरांसंबधीचे तसेच प्रतिकूल परिस्थितीत त्या काळातील सुधारकांच्या मदतीने केलेले विधवापुनर्विवाहाचे कार्य या प्रवासाविषयी अनेक संदर्भ ग्रंथांचा दाखला देत शोधनिबंध पूर्ण केला आहे .तसेच माझे काही निष्कर्ष ही नोंदवले आहेत.*

*डॉ.विलास खोले आपल्या महर्षी धोंडो केशव कर्वे या ग्रंथात नोंदवतात "धोंडो केशव कर्वे यांच्या जीवनाचे आणि कार्याचे वेगळेपण अनेक प्रकारांनी सांगता येते.सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे वरवर पाहता किरकोळ शरीरयष्टी लाभलेल्या कर्वे यांना शंभराहून अधिक वर्षांचे आयुष्य लाभले .इंग्रजी सत्तेचा अंमल प्रस्थापित झाल्यापासून देशाला स्वातंत्र्य प्राप्ती होई पर्यन्तचा सगळा काळ त्यांना अनुभवता आला देशातील धर्म सुधारणेचे व समाजसुधारणेचे सगळे महत्वाचे उपक्रम, देशातील शिक्षण विषयक वेगवेगळे प्रयोग त्यांनी जवळून व स्व अनुभव घेऊन पहिले" ही खूप मोठी उपलब्धी आहे पुढील अभ्यासकांसाठी असे मलाही वाटते.*

*प्राचीन भारतातील स्त्रियांचा 'दर्जा 'पुढील कालखंडानुसार पाहता येईल १) आदिम काळ २) सिंधू संस्कृती 3) वैदिक काळ ४) स्मृती व सूत्रकाळ ५) बौद्ध काळ ६) मनुस्मृती काळ ७) गुप्त वाकाटक काळ ८) हर्षोत्तरकाळ इ. या सर्व कालखंडातील स्त्रियांचा दर्जा पुढील साहित्य व ग्रंथातून शोधाता येतो. १) वैदिक साहित्य २) महाकाव्ये व पुराणे 3) बौद्ध व जैन धर्माचे साहित्य ४) धर्मसूत्रे ५) स्मृती साहित्य ६) कौटिल्याचे अर्थशास्त्र ७) संस्कृत व प्राकृत साहित्य ८) परकीयांची प्रवास वर्णने ९) पुरातत्वीय साधने – मंदिर, लेण्या, मूर्ती इ.*

**महत्त्वाचे शब्द** *: विधवा, विवाह, पुनर्विवाह, बालविवाह*

Copyright © 2022 The Author(s): This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

## प्राचीन, मध्ययुगीन, शिवशाही, पेशवाई आणि स्वात्तंत्रोत्तर कालखंड

जगात आणि भारतात 'समाज' हा टोळी समाज होता, स्थिर नव्हता. त्या काळात अन्न जमा करणे,प्राण्याची शिकार करणे, मासे पकडणे, ही सर्व कामे स्त्री पुरुष एकत्र करत. टोळी समाज असतांना शेतीचा शोध स्त्रियांनीच लावला असे म्हटले जाते "भारतातील यातुविधी,जगभरातील

शेतीविधी, जगभरातील आदी-जमातीत टिकून असलेले मातृउपासनेचे अवशेष,धर्मातून विधीद्वारे टिकवले गेलेले काही अंशात्मक पुरावे यामधून स्त्रीचे हे स्थान स्पस्टपणे भिडते हजारो सहस्रके पुरुषाने स्त्रीला दडपून टाकणे शक्य होऊ शकले नाही परंतु तरीही एक काळ असा आला की निसर्गमूल्यांचे निष्ठेने जतन करणारी समतावादी मातृसंस्कृती अचानक हादरली सस्तन प्राण्यात अस्तित्वात नसलेली पितृत्वाची संकल्पना या मातृसंस्कृतीवर आघात करून गेली" १पुढे पितृसत्ताक कुटुंब पद्धती अस्तित्वात आली. गृह्सत्ता आणि अर्थसत्ता स्त्रियांच्या हातून पुरुषांच्या हाती गेली कुटुंब प्रमुखाने बायको व मुले यांच्यावर वर्चस्व प्रस्थापित केले त्यानंतर कुटुंबातील स्त्रियांचा दर्जा घसरत गेला. भारतातही हेच घडले आहे. "प्राचीन कालखंडात पितृसत्ताक कुटुंब पद्धती असल्याने मुलाच्या जन्माचे स्वागत केले जाई. मुलगा कुटुंबाचे नाव पुढे चालवतो, धार्मिक कार्य पार पडतो. कुटुंबाचे रक्षण,पोषण करतो असा समज होता. युद्धजन्य परिस्थितीमुळे मुलांच्या जन्माचे स्वागत केले जाई. उत्तर वैदिक कालखंडात स्त्रियांवर जेव्हा अनेक बंधने टाकली गेली तेव्हा मुलगी हे दु:खाचे व चिंतेचे कारण होते असा समज निर्माण झाला. मुलगी व्हावी म्हणून प्रार्थना केल्याचे एकही सुक्त ऋग्वेदात नाही"२ कन्या वधाची प्रथा मध्ययुगीन काळापासून विशेषतः राजस्थान मध्ये रुढ झाली.

ऋग्वेदात प्रौढ विवाहाची पद्धत रुढ होती "घोषा या स्त्रीचा विवाह खूप उशिरा झाला होता. महाभारतातील शकुंतला, देवयानी, सत्यवती, दमयंती, कुंती, द्रौपदी, सुभद्रा, या स्त्रियांचे विवाह तरुण वयात झाले होते एखाद्या स्त्रीला योग्य वर मिळाला नाही तर ती आपल्या पित्याच्या घरी राहत असे. गांधर्वविवाह करणारे प्रौढच असत इ. सं. पूर्व ५व्या शतकापर्यंत प्रौढ विवाहाची पद्धत रुढ होती नंतर मात्र ती मागे पडली. इ. सं. पु. ४०० ते इ. सं. पु. १०० या काळात ऋतुप्राप्तीच्या अगोदरच मुलीचे लग्न झाले पाहिजे असा विचार स्मृतीकारांनी मांडला त्यामुळे बालविवाहाची प्रथा रुढ झाली "३ बालविवाहाच्या रुढीमुळे मुलींचे शिक्षण संपुष्टात आले समाजातील सत्याची प्रतिष्टा कमी झाली विकासाची संधी तिला मिळाली नाही व स्त्री बंदिस्त झाली.

विवाह हा एक महत्वाचा संस्कार होता. संतती व धर्मकार्ये पार पाडणे हे लग्नाचे मुख्य उद्देश होते ब्राह्मण युगात विवाहांचे आठ प्रकार रुढ झाले व त्याचे पालन, अस्तित्व पुढे कित्येक शतके कायम राहिलेहे आठ प्रकारचे विवाह पुढील प्रमाणे "१) ब्रह्म विवाह –विद्वान व शीलवान तरुणास आपल्या मुलीचे सालंकृत कन्यादान करून देणे, २) दैवविवाह –विद्वान व तरुण पुरोहिताला दक्षिणे ऐवजी कन्या अर्पण करणे, ३) आर्य विवाह –वराकडून मोबदला घेऊन कन्या देणे, ४) प्रजापत्य विवाह –वराकडून काही न घेता अथवा काही न देता कन्या देणे, ५) असुरविवाह–विवाह वधूला किवा वरपित्याला धन,पैसा देऊन जो विवाह होतो त्यास असुर विवाह म्हणत दशरथ –कैकयी, पांडू-माद्री हे असुर विवाह होत, ६) गांधर्व विवाह –प्रियकर व प्रेयसी या दोघांच्या संमतीने होणारा हा प्रेमविवाहच असे आई वडिलांची समती आवश्यक नाही उदा. दुष्यंत –शकुंतला विवाह, ७) राक्षस विवाह –वधूचे सक्तीने अपहरण करून तिच्याशी विवाह लावणे-अर्जुन-सुभद्रा, श्रीकृष्ण –रुक्मिणी, हा राक्षस विवाह होता. विशेषत:लढाऊ गणात हा प्रकार रुढ होता. ८) पैशाच विवाह- स्त्री झोपलेली असतांना किवा तिने मद्यप्राशन केले असता,तसेच बेशुद्धावस्थेत असतांना तिच्यावर बलात्कार करून तिच्याशी लग्न करणे हा विवाह प्रकार अत्यंत निंद्य मानला जाई"४ पण काही विशिष्ठ परीस्थितीत स्त्रियांचा पुनर्विवाहाचा हक्क ऋग्वेदात मान्य केला होता. "१) पती परागंदा झाला २) सन्यासी बनला ३) त्याने वर्ण बदलला ४) नपुसकत्व आले पती धर्म कार्याला गेला असेल तर पत्नीने ६ वर्ष वाट पहावी, कीर्ती व पैशासाठी गेला असेल तर ३ वर्ष वाट पहावी तसेच विवाहिता दोन वर्ष पुत्रहीन राहिली, संतती जिवंत राहत असेल, पत्नी उद्धट व पुत्रहीन असेल तर पत्नीने दुसरा विवाह दहाव्या वर्षी करावा असे मनूने म्हटले आहे"५ भारतीय विवाह संस्थेचा इतिहास हे वि. का. राजवाडे यांचे पुस्तक अनेक वर्ष चर्चेचा विषय बनले होते त्यात दिलेली माहिती प्रत्यक्ष पुराव्यांवर आधारित आहे.

मध्ययुगाच्या इ. स. ६५० ते १७०७ पर्यंतच्या कालखंडात राष्ट्रकुट ते यादव काळात स्त्रियांचा दर्जा खालावलेलाच होता. यादव काळापासूनच

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

केशवपनाची प्रथा महाराष्ट्रात रुढ झाली विधवा स्त्रियां आपले उर्वरित जीवन परमार्थाच्या मार्गी लावत. मनु व याज्ञवल्क्य या स्मृतीकारांनी केशवपन प्रथेबाबत मौन धरण केले होते. २६ सप्टेंबर १८९२ च्या सुधारक पत्रात आगरकरांनी हे पतीप्रेम की, पुरुष वर्गाची निघृणता हा लेख लिहून सती प्रथेवर टीका केली होती. म. फुले यांनीही सतीप्रथेवर टीका केली होती व पुरुषाला मृत पत्नीबद्दल दु:ख होऊन तो कधी सती गेला काय? असा प्रश्न विचारला होता. ”६ “भारतीय स्त्रियांचा दर्जा आणि महराष्ट्रातील स्त्रियांचा दर्जा यात प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात फारसा बदल झाला नाही भारतीय समाजजीवन १८व्या शतकापर्यंत स्थितीशील,गतीशुन्य होते स्त्री जीवनात कोणतेही परिवर्तन झाले नाही इ. स. १८००-१८८२ या काळात पेशव्यांची राजधानी पुणे शहरात दरसाल १२ स्त्रिया सती जात असे सरकारी नोंदीवरून दिसते. सतीबंदीचा कायदा पास होऊ नये म्हणून सनातन्यांनी थेट इंग्लंडच्या पार्लमेंटकडे धाव घेतली होती तरी इंग्लंड सरकारने कायदा केलाच” होता.

बालविवाहाची प्रथा १९ व्या शतकातही नवी नव्हती ही प्रथा योग्य की अयोग्य, न्यायी की अन्यायी,फायद्याची की नुकसानीची याची साधी चर्चाही १८ व्या शतकापर्यंत झाली नाही. या प्रथेला धर्मशास्त्राचा आधार आहे का? असाही प्रश्न कोणी विचारला नाही. बालविवाह, केशवपन, पुनर्विवाहास बंदी या प्रथा ब्राह्मण वर्गातच रुढ होत्या त्यांचाच आदर्श घेऊन सोनार, प्रभू यांनी अनुकरण केल्याचे दिसते. समाजसुधारकांचे व त्यांच्या पत्नीचे लग्नाच्या वेळेचेवय पुढील प्रमाणे उदा. दाखल सांगता येईल “ १) गोपाळ हरी देशमुख वय-७ पत्नीचे वय -६,२) महादेव गोविंद रानडे वय -१२ पत्नीचे - ८, दुसरे लग्न वय -३१ पत्नीचे वय -११, 3) गोपाळराव जोशी वय -३२ पत्नीचे वय १०, ४) दादोबा पांडुरंग वय- १३ पत्नीचे वय -८, ५) नाना फडणवीस वय ५० पत्नीचे वय -७, डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांनी आपल्या 3 मुलीना उच्च शिक्षण दिले व त्यांची लग्ने २२-२३ वर्षे संपल्यानंतर केली हा त्या काळातील एक अपवाद होय. स्वत:ला सुधारक म्हणवणारे स्वत:चे, मुलींचे, बहिणींचे लग्न बालवयातच करत होते. ही मोठी विसंगती होती” यावर काय बोलणार? बालविवाह पद्धतीचा एक अपरिहार्य परिणाम म्हणजे स्त्रीला येणारे अकाली वैधव्य होय विधवेच्या वाट्याला अत्यंत निकृष्ट, दुर्लक्षित, अपमानास्पद जीवन येई. विधवा स्त्री चांगल्या चालीरीतीची नसतेच असा एक पक्का समज होता. गोदुताई पुनर्विवाह नंतर जेव्हा धोंडो केशव कर्वे यांच्या घरी आल्या तेव्हा शेजारच्या एका विधवा बाईने लग्नाच्या वेळी तुला किती महिने झाले? असा प्रश्न विचारला होता. “हिंदू उच्चवर्णीय विधवांना पुनर्विवाहास बंदी असल्याने त्यांच्या हातून भ्रूणहत्या,बालहत्या हे गुन्हे घडत. त्यांच्या बातम्या ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश या तत्कालीन वृतपत्रातून येताना दिसतात तरुण विधवा कोणाच्या तरी वासनेला बळी पडत, गरोदर राहत व लोकभयास्तव भ्रूणहत्या करत. बऱ्याच वेळेस तीर्थयात्रेच्या निमिताने अशा गरोदर विधवेला सोबत नेत व तिकडेच तिचा गर्भपातही करत. आगरकरांच्या सुधारक या पत्रावरून असे दिसते की, स्त्रियांच्या संख्येत १/३ विधवा असत. विधवांना कारागृहातील कैद्यांप्रमाणे वागूनही नद्यांत, रस्त्यांवर व अनाथगृहात लहान मुलांची प्रेते व सजीवमुले कोठून येतात? असा प्रश्न आगरकर एका लेखात उपस्थित करतात. काही पालकांनीच विधवा मुली वेश्येला विकल्याचे प्रकार घडत. धर्मप्रमुख शंकराचार्य पापी विधवेला धर्माच्या नावाखाली अमानुष अशी शिक्षा ठोठावत. ”

“थिओडर पार्कर” या अमेरिकन विचारवंतांच्या प्रभावाने सर्वस्वी भिन्न अशी विचाराची व कृतीची प्रेरणा जोतीराव फुले यांना मिळाली होती मुलींच्या शिक्षणासाठी एका पाठोपाठ एक अशा शाळा काढण्याचे जोतीराव फुले यांचे प्रेरणादायी कार्य स्त्री शिक्षणाला चालना देऊ लागले होते. जोतीरावानी मुलींची शाळा काढली ती महर्षी कर्वे यांच्या जन्माच्या दहा वर्षे अगोदर जोतीरावांचे द्रष्टेपण निर्विवाद सर्वमान्य आहे त्यांचे शिक्षणक्षेत्रातील कार्य पायाभूत स्वरूपाचे आहे” यात शंकाच नाही.

१९ व्या व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात स्त्री शिक्षणाचे प्रमाण फारच कमी होते. १९ व्या शतकातील दलित व मुस्लीम स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

आपणास फारशी माहिती मिळत नाही याचे कारण दलित व मुस्लीम स्त्रियात शिक्षणाचा अभाव हेच होते दलित स्त्रियांच्या शिक्षणा बाबत म. फुले, राजर्षी शाहू महाराज, बडोद्याचे गायकवाड महाराज यांनी लक्ष दिले ; पण ब्राह्मण सुधारकांनी लक्ष दिले नाही, असे दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी Rise and fall of Hindu Women या ग्रंथात " भारतीय स्त्रियांच्या अवनतीला व नाशाला बुद्ध नव्हे तर मनू जबाबदार आहे बुद्धाचा उदय होण्यापूर्वी ज्ञान मिळवण्याचा व आपला धार्मिक उत्कर्ष साधण्याचा हक्क स्त्रीला नाकारण्यात आला होता; पण बुद्धानेच स्त्रियांनाही ज्ञान मिळावे व आपली प्रगती करून घेता यावी यांची परवानगी बुद्धाने दिली. भारतीय स्त्रीला स्वातंत्र्य व प्रतिष्टा देणारी ती फार मोठी क्रांती होती" असे आज सर्वमान्य आहे.

**महर्षी धोंडो केशव कर्वे**

धोंडो केशव कर्वे यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी मुरुड गावापासून पंधरा मैलांवर असणाऱ्या शेरवली या आजोळच्या गावी झाला. त्यांच्या पूर्वीच्या चार पिढ्या मुरूडच्या. "मुरुड गावचे मुळ नाव मूळवटग्राम असे असावे १८६५ मध्ये या गावात ३०५ घरे व १३५८ माणसे होती. १९११ च्या जनगणने नुसार ८४२ पुरुष व ९७७ स्त्रिया होत्या या पैकी १६७ घरे व ६०९ माणसे ब्राह्मणांची होती" असे कर्वे यांनी आपल्या चरित्रात नमूद केले आहे. केशव कर्वे व लक्ष्मीबाई या दांपत्याला एकंदर सहा मुले झाली त्यापैकी पहिली तीन मुले एकापाठोपाठ एक वारली त्यानंतर भिकू (१८५३), धोंडू (१८५८ ) अंबाताई (१८६१) ही अपत्य झाली. अंबाताई बुद्धिमान,दूरदर्शी, व्यवहारदक्ष आणि कर्तबगार होती. तिचे यजमान भिक्षुकी करीत. तिला बरीच वर्षे कडक सासुरवासाला तोंड द्यावे लागले आणि ३० शीच्या वयातच तिच्यावर वैधव्याचे संकट कोसळले नवरा व सासू वारल्या नंतर संसाराची सगळी जबाबदारी तिच्यावर पडली. वयाच्या १५ व्या वर्षी धोंडूचे लग्न राधाबाईशी झाले (१८७३) दोघांच्या वयात ६ वर्षांचे अंतर होते. म्हणजे राधाबाईचे वय ९ वर्षे होते. धोंडूचे वय २४ आणि राधाबाईचे वय १८ असतांना त्यांना रघुनाथ नावाचे पहिले अपत्य झाले. १८९१ मध्ये राधाबाईचा मृत्यू झाला. मुंबईचे १३ वर्षांच्या वास्तव्यानंतरधोंडोपत १५ नोव्हेंबर १८९१ रोजी पुण्यातील फर्गुसन कॉलेजला प्राध्यापक म्हणून रुजू झाले. धोंडो केशव कर्वे यांच्या अध्यापनाविषयी आचर्य प्र. के. अत्रे यांनी 'कऱ्हेचे पाणी' या आत्मचरित्राच्या पहिल्या खंडात आपली आठवण दिली आहे. १९१२ च्या अखेरीस धोंडोपंतांची सेवेची वीस वर्षे पुरी झाली १९१४ च्या अखेरीस त्यांचा डेक्कन एज्युकेशन सोसायटीशी असलेला संबंध संपला.

**महाराष्ट्रातील विधवा पुनर्विवाह**

धोंडो केशव कर्वे यांच्या विधवा पुनर्विवाहाच्या कृतीकडे वळण्यापूर्वी विधवा पुनर्विवाहाचा महाराष्ट्रातील इतिहास लक्षात घेता येईल. "२५ जुलै १८५६ रोजी हिंदू विधवांच्या पुनर्विवाहाच्या मार्गातील अडथळे दूर करणारा ऐतिहासिक महत्वाचा कायदा त्यावेळी इंग्रज सरकारने पास केला होता. तत्पूर्वी लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी विधवांच्या दु:स्थिती संबंधी गव्हर्नरकडे अर्ज पाठवला होता. १० जून १८४८ रोजी बॉम्बे टाइम्स मध्ये प्रसिद्ध झालेला हा अर्ज त्यांनी मुळात २६ मे १८४८ रोजी लिहिला होता. अर्थात हा कायदा पास झाल्यामुळे विधवा पुनर्विवाहाच्या बाबतीतील तांत्रिक अडथळा दूर झाला होता"१३ असे नाही या नंतर १) ८ मार्च १८६० रोजी पहिला महाराष्ट्रीय पुनर्विवाह झाला तो रघुनाथ जनार्धन भांडारकर वय २२ वर्षे व नर्मदाबाई वय १६ वर्षे त्यांना वैधव्य आले होते वयाच्या ७ व्या वर्षी. २) २३ नोव्होबर १८६५ वकील नाना भिडे व मोरो रामचंद्र पेंडसे वादेघोडेकर यांची ३० वर्षाची विधवा कन्या. या वधूचा केशवपन विधीही झालेला होता. ३) १५ जुन १८६९ पांडुरंग विनायक करमरकर २५ वर्षांचे प्रथम वर व प्रभाकर परांजपे यांची विधवा कन्या वेणूबाई वयाच्या ९ व्या वर्षी ८ महिन्यात वैधव्य आले होते. ४) २२ मार्च १८७० मोरोबा कान्होबा विजयकर आणि सुमित्राबाई भवानी शंकर राघवानंद यांची विधवा कन्या. ५) १४ डिसेंबर १८७४ विष्णूशास्त्री पंडीत वय

४७ व कुसाताई वय २५ वामनराव आगाशे यांची विधवा कन्या. ६) ७ जानेवारी १८७८ सदाशिव पांडुरंग केळकर वय २७ व दुर्गाबाई वय १८ सीताराम अलूरकर यांची विधवा कन्या. ७) ११ में १८९१ गोपाळ पाणदिकरव शांताबाई एक तपाचे वैधव्य ही रा. गो. भांडारकर यांची कन्या या विवाहामुळे धोंडो कर्वे यांना आपल्या विधवा पुनर्विवाह करण्याच्या निर्णयाशी ठाम राहण्याचे बळ मिळाले असण्याची शक्यता आहे.

धोंडोपंत कॉलेजात असतांना १२ जून १८८३ च्या केसरीच्या अंकात विधवांच्या स्थिती सबंधाने करूण रसातील हृदयद्रावक असे एक पद प्रसिद्ध झाले ते धोंडोपंताना फार आवडले. व त्यांनी ते पाठ केले होते. १८९५ मध्ये त्यांनी त्या पदाच्या तीन हजार प्रती वाटल्या होत्या. "विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता न देणे याचा अर्थ मानवधर्माला अनुचीत अशा गतानुगतिकेचा स्वीकार करणे होय. साठीच्या पुरुषाच्या सुद्धा दुसऱ्या लग्नाला मान्यता द्यायची परंतु पाच वर्षाच्या विधवा मुलीला मात्र तिचे पूर्वजन्मीचे पाप आड आले असे सांगायचे, विधवा मुलीना स्त्रियांना त्यांचा तिळमात्र अपराध नसताना दु:खसागरात लोटायचे, हे क्रूर कर्म आहे. त्यांना पुनर्विवाहास समती द्यावयास हवी असा मतितार्थ व्यक्त करणारे हे पद धोंडोपंत कर्वे आणि नरहरपंत जोशी व त्यांच्या समविचारी मित्रांना अत्यंत प्रिय होते. " धोंडोपंत कर्वे यांना पुनर्विवाहास विचार प्रवृत्त करणाऱ्या दोन गोष्टींचा उल्लेख करणे येथे अपरिहार्य आहे १) हे पद आणि २) स्त्री जातीविषयीची सहानुभूती होय. विधवा स्त्रियांच्या दु:खाने धोंडो कर्वे नेहमी कळवळत असत. कुटुंब कोणतेही असो विधवा स्त्रीचे प्रचंड हाल होत. या संबंधीच्या भीषण परिस्थितीचे वर्णन आनंदीबाई कर्वे यांनी आपल्या 'माझे पुराण' या आत्मचरित्रात लिहून ठेवले आहे. ते येथे देणे उचित होईल "एखादी बालविधवा म्हणजे लोकांना एक गमतीची आणि बेवारशी वस्तू वाटे त्यावेळी. कोणी वेडेवाकडे बोलावे,कोणी उगीचच खोडी काढावी,कोणी माझ्याकडे बघून वाकुल्या दाखवाव्यात" विधावांविषयी विशेष सहानुभूती व आस्थाउत्पन्न होण्याला नरहरपंतांच्या वडील बहिणीचे अत्यंत हृदयदावक प्रत्यक्ष उदाहरण धोंडोपंतांच्या समोर होते. त्याकाळात केसरी-सुधारक पत्रातील सुधारणावादी विचारांकडे धोंडो कर्वे यांचा ओढा होता. गोपाळ गणेश आगरकर यांच्या आग्रही व आमुलाग्र सुधारणावादी विचारांचा खोलवर परिणाम त्यांच्या मनावर झाला होता. न्यायमूर्ती रानडे यांच्या समतोल व प्रगल्भ व्यक्तिमत्वाचे तसेच त्यांच्या सुधारणावादी प्रतिपादनाचे महत्व त्यांना उमगले होते आणि सर्वात महत्वाचे म्हणजे विष्णू परशुरामशास्त्री पंडीत यांच्या पुनर्विवाहोत्तेजक कार्यामधून धोंडो कर्वे यांना आपणही असे काहीतरी करावयास हवे अशी प्रेरणा मिळाली.

**धोंडो केशव कर्वे यांचा विधूर विधवा पुनर्विवाह**

गोदुबाईचे पहिले लग्न तिच्या वयाच्या ८ व्या वर्षी झाले होते "आम्हा भावंडातली सर्वात वडील बहिण आक्का,हिचे लग्न भावे नावाच्या गृहस्थाशी झाले होते. ते जेथे राहत तेथेच शेजारी नातू नावाचे विद्यार्थी राहत त्यांना माझी आतेबहीण दिलेली होती भावे यांच्या बायकोच्या आग्रहावरून नातुनी आपली बायको मुंबईस आणली होती. दुर्दैवाने ती माझी आते बहीण म्हणजे नातुंची बायको देवी येऊन तेथेच वारली. त्यावेळी नातूंचे वय फक्त २० वर्षांचे होते व माझी ८ वर्षे पुरी होत आली होती. तेव्हा माझ्यासाठी नातू हे वर निश्चित करावे असे अक्काला वाटले आम्हा दोघात १२ वर्षांचे अंतर होते. लग्नाच्या वेळी भांडण तंटण झाले नाही. नातूंकडील मंडळीनीच लग्नाचा दोन्हीकडचा खर्च केला" या लग्नाला 3 महिने झाल्यावर नातू मुंबईत आजारी पडले आणि त्यातच त्यांचे निधन झाले. म्हणजे वयाच्या ८ व्या वर्षी गोदुबाईना वैधव्य आले. पुढे मुंबई मध्ये ११ मार्च १८९० रोजी मुंबईत विल्सन कॉलेजच्याजवळ चौपाटीवरएका भाड्याच्या घरात पंडिता रमाबाई यांनीशारदासदन सुरु केले व ते पुढे दीड पावणेदोन वर्षात पुण्यात आले. या सदनामधली पहिली विधवा विद्यार्थिनी म्हणून गोदुबाई दखल झाल्या. ११ मार्च १८९३ रोजी धोंडोपंत कर्वे व गोदुताई यांचे लग्न झाले. मालवण तालुक्यातील वेदमूर्ती भिकंभट यांनी पौरोहित्य केले. रामभाऊ जोशी यांनी सर्व व्यवस्था केली प्रिन्सिपल गोपाळ गणेश आगरकर यांनी निमंत्रण पत्रिकेवर सह्या केल्या. गोदुताई पंडिता रमाबाईंच्या लाडक्या होत्या त्यामुळे त्यांनी लग्नाचा मोठा समारंभ केला. "जेवणे आटोपल्या

ISSN–2277- 8721

EIIRJ

ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Volume–XI, Issue– III May – June 2022

Original Research Article

नंतर बक्षिसे देऊन विध्यार्थिनी,पाहुणे मंडळी यासर्वांनी प्रेमाने आशीर्वाद दिले. बाईनी गोदुबाईना दागिने, लुगडी, दिली. जावयाला म्हणजे धोंडोपंत कर्वे यांना कपडे दिले. त्यावेळी त्यांनी मुलीना सांगितले " तुम्हा पैकी कोणाला वाटले की,लग्न केल की बाई थाट करतात. पण अस मनात आणू नका. हे कार्य पहिल आणि शेवटच" जेवणावेळी शेजारी बसलेले डॉ. भांडारकर कर्वे यांना म्हणाले " तुम्ही बायकोचे नाव काय ठेवणार ते उखाणा घेऊन सांगा, तेव्हा कर्वे म्हणाले " सदनाचे उपकार,मजवर झाले फार; आनंदीने फेडायला असावे तयार. गोदुबाईनी मात्र कर्व्यांचे नाव कधीच घेतले नाही कारण धोंडो हे नाव त्यांना कधी आवडतच नव्हते. लग्नाच्या अगोदर त्या कर्व्यांना इतरांप्रमाणे अण्णा म्हणत पण, लग्नानंतर पंडिता रमाबाईनी सुचवल्यावरून त्या कर्वे म्हणू लागल्या" या नव्या संसाराची सुरुवात करतांना गोदुबाईंचे वय २८ वर्षांचे व धोंडो कर्वेचे वय ३५ वर्षांचे होते. यशोदाबाई आगरकर कर्व्यांच्या पुनर्विवाहाची आठवण सांगताना म्हणतात की, "लग्नाच्या वेळी कर्व्यांनी विनंती केल्यावरून कर्वे मुलीशी चांगले वागतील तिचे आयुष्य सुखाचे होईल या बद्दल खास तजवीज करतील या बद्दल आगरकर जामीन राहिले होते त्या नंतर आनंदीबाई थट्टेने यशोदाबाईनां 'तुम्ही माझ्या सासूबाई आहात असे म्हणायच्या" यावरून पुनर्विवाहितेशी तिचा नवरा सर्वतोपरी चांगला वागेन याची खात्री करून देण्याची जबाबदारी सुधारक उचलीत होते असे दिसते.

**विधवा पुनर्विवाहाचे परिणाम**

धोंडो केशव कर्वे यांनी आनंदीबाईशी पुनर्विवाह केल्यावर त्यांच्या माहेरच्या घरावर बहिष्कार पडला त्याबद्दल पार्वतीबाई आठवले "आनंदीचे वडील या पुनर्विवाहास अनुकूल होते असे सुधारकात छपून आले, नंतर हे वृत्त चुकीचे आहे, असेही छपून आले. या सगळ्या गोंधळामुळे ग्रामस्थांनी त्यांना रामाच्या देवळात बारा नमस्कार घालावयास लावले आणि देवळाच्या जीर्णोद्धारासाठी त्यांच्याकडून शंभर रुपये वसूल केले. झाल्या प्रकारचे एवढे प्रायश्चित्त दिल्यानंतर धोंडो कर्वे यांच्या सासऱ्यांवरचा ग्रामस्थांचा राग ओसरला. " होता.

धोंडो कर्वे यांच्या पुनर्विवाहा संबंधी तत्कालीन वृत्तपत्रातून वेगवेगळ्याप्रकारचे अभिप्राय प्रसिद्ध झाले होते त्यात इंदुप्रकाश, सुधारक, ज्ञानप्रकाश, सुबोधपत्रिका वैदर्भी (अकोला), ज्ञानचक्षु (पुणे) आदी. यात जसे कौतुक करणारी वृत्तपत्रे दिसतात तसे दूषणे देणारी वृत्तपत्रेही दिसतात मुरुड गावाने त्यांच्या संपूर्ण कुटुंबावर बहिष्कार टाकला. "कर्व्यांना आपल्या आई-वडील, भाऊ-भावजयींशी बोलणे देखील बंद करावे लागले. आपल्या घरापासून दुर एका गोठ्यात त्यांना रहावे लागले. याचा परिणाम कर्व्यांच्या वडिलांवर झाला ते भ्रमिष्टासारखे व वेड्यासारखे करू लागले सुमारे तीन चार महिने त्यांची स्थिती सोचनीय होती. आईच्या व अंबाताईच्या दु:खाचा तर कळसच झाला. इतक्या थरावर हे प्रकरण जाईल असा माझा अंदाज नव्हता. इतका अंदाज असता तर मी ही उडी घेतली असती की नाही यांची मला शंका आहे" बहिष्कार हा किती असहाय्य होऊ शकतो, हे कर्वे यांच्या या वक्तव्यावरून लक्षात येते. लग्नाच्या दुसऱ्या दिवसापासून धोंडो कर्वे आणि आनंदीबाई या दोघानाही समाजातील वेगवेगळ्या थरातून येणाऱ्या प्रतिक्रियांना तोंड द्यावे लागले. आनंदीबाईनच्या धाकट्या बहिणीचे सासरे कर्वे यांच्याकडे आले पुनर्विवाहाची कथा एकूण त्यांना मस्तकशूळ झाला होता. शेवटी स्वत:च्या बोलण्याला स्वत:च कंटाळून "तुम्हा काळतोंड्यांचे पुनश्च: दर्शन नको !" असे म्हणून ते गृहस्थ निघून गेले. असाच प्रकार तीन वर्षांनी त्यांना अनुभवास आला. कर्वे भालचंद्र यांच्या घरी अनाथबालिकाश्रमास मदत मागण्यासाठी गेले असता एक अनोळखी गृहस्थ त्यांच्या पाठोपाठ आले आणि त्यांनी रानडे,भांडारकर या सर्व सुधारक मंडळीचां नामोल्लेख करून कर्वे यांच्यावर शिव्यांचा भडीमार केला इतकेच नव्हे तर "तुमच्या कर्माची फळे तुम्हाला भोगावी लागतील" अशी शापवाणीही त्यांनी केली तिसऱ्या प्रसंगात कर्वे एका तालुक्याच्या गावी गेले असता एक शास्त्रीबुवा त्यांना म्हणाले "पुरे करा आपली मला माहिती आहे व्यभिचारावर पाघरूनघालण्यासाठी पुनर्विवाह करून आता हे धंदे आरंभले आहेत !" आता अर्थात अशा घटनामुळे कर्वे यांच्या कामात वा नित्य व्यवहारात काही फरक पडला नाही.

ISSN–2277- 8721
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

**धोंडो केशव कर्वे यांचे महत्कार्य**

१८९३ मध्ये कर्व्यांनी पुढाकार घेऊन 'विधवा विवाहोत्तेजक मंडळी स्थापन' केली. त्या भुमिके बद्दल ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात "जातिभेदाचा अत्यंत बिकट प्रश्न बाजूला ठेवून निर्भेळ पुनर्विवाहाच्याच कार्यासाठी झटण्याचा मी निश्चय केला आहे. विधवा विवाहाचे कार्य जितके लोकमतला न दुखविता करणे शक्य असेल तितके करावे. पुनर्विवाहिताकडे लोकांचे लक्ष साहजिक विशेष असल्यामुळे या गोष्टीत देखील लोकमताला न दुखवण्याचे धोरण. या वरून त्यांची भूमिका मनोवृत्ती काम करण्याची पद्धती दिसते समाजाला कसलेही धक्के न देता समजुतीची भूमिका घेवून समाजाला बरोबर घेवून पुढे जाण्याचा प्रयत्न दिसतो. विधवा –विवाह-प्रतिबंध-निवारक मंडळीचां लोकांना परिचय द्यावा, मंडळींसाठी अर्थ साहाय मिळवावे,पुनर्विवाहा सबंधी लोकमत आजमावे आणि या जटील प्रश्ना सबंधी लोकांमध्ये जागृती व सहानुभूती उत्पन्न करावी या दृष्टीने १८८४ मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसला माहिती देण्यासाठी कर्वे मद्रासला गेले. पुढे १८९५ मध्ये संपूर्ण महाराष्ट्राच्या सर्व भागात त्यांनी दौरा केला. मुंबईच्या हेमंत व्याख्यानमालेत त्यांनी पुनर्विवाहाच्या चळवळीचा पंचवीस वर्षांचा इतिहास या विषयावर व्याख्यान दिले. विधवा –विवाह-प्रतिबंध-निवारक मंडळी या संस्थेला स्थैर्य येण्यासाठी धोंडो कर्वे यांनी १८९८ च्या ऑक्टोबर मध्ये संस्थेची कायदेशीर नोंदणी करून घेतली. व २८ जानेवारी १९०० पर्यंत चिटणीसपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. विधवा शिक्षणाचे काम व विधवाविवाहाचे काम वेगवेगळे करून आता त्यांनी विधवा शिक्षणाच्या कार्याला अग्रक्रम दिला. आणि त्या दिशेने कार्य सुरु केले. १४ जून १८९६ या दिवशी 'अनाथ बालीकाश्रमाची मंडळी' ही संस्था स्थापन केली. १८९६ व १८९७ या दोन्ही वर्षी संस्थेस आर्थिक मदत मिळण्यासाठी त्यांनी बराच प्रवास केला आपल्या आयुष्याची ५ हजार रुपयांची विम्याची पॉलिसी आश्रमाला अर्पण केली. ४ मार्च १९०७ रोजी महिला विद्यालायाची स्थापना केली. ४ नोव्हेबर १९०८ निष्काम –कर्म-मठ याची स्थापना केली. जून १९१७ मध्ये अध्यापक विध्यालयाची स्थापना केली. एप्रिल १९१८ला कन्या शाळेची स्थापना केली. १९३६ मध्ये महाराष्ट्र ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळीची स्थापना केली. २० नोव्होबर १९५० ला बाया उर्फ आनंदीबाई यांचे निधन झाले. आणि पुढे वयाच्या १०४ यावर्षी ९ नोव्होबर १९६२ मध्ये धोंडो केशव कर्वे यांचे निधन झाले. १०० वर्षांचा रोमहर्षक कालखंड धोंडो केशव कर्वे यांना अनुभवता आला. "आज एकविसाव्या शतकातही विधवा स्त्रियांचा जो बहुविध छळ होतो,त्याचे सर्व पातळ्यावर जे शोषण होते त्यासबंधी वांरवार प्रसिद्धहोणारे राष्ट्रीय व जागतिक अहवाल पाहिले म्हणजे ज्या काळात धोंडो केशव कर्वे यांनी विधवा स्त्रियासाठी जे कार्य सुरु केले व नेटाने चालवले त्याचे मोल व महत्व पटते. " यात शंका नाही.

**समारोप**

धोंडो केशव कर्वे यांच्या कार्याचे एक अंग जसे शैक्षणिक स्वरूपाचे होते तसे दुसरे अंग सामाजिक स्वरूपाचे आहे. त्यांच्या कार्यामुळे सुरुवातीच्या काळात जरी ब्राह्मण स्त्रीयांना शिक्षणाची वा विवाहाची संधी मिळाली असली तरी नंतरच्या काळात सर्व जातींच्या स्त्रीयांना त्यांच्या कार्याचा लाभ घडला कर्वे यांच्या उत्तरआयुष्यात ब्राह्मण विद्यार्थिनी इतक्याच अन्य जाती-जमातीतील विद्यार्थिनी शिकू लागल्या आहेत. आज विधवेच्या पुनर्विवाहाची समस्या उरलेली नाही. ज्या विधवेला पुनर्विवाह करण्याची इच्छा असेल तिला आता विरोध होत नाही. एकोणिसाव्या शतकातील बऱ्याच विधवांना पुनर्विवाहाची इच्छा नव्हती कारण समाजाचा रोष,त्यातून शन करावे लागणारे हाल आणि मनावरील धार्मिकतेचे,पतिव्रतेचे संस्कार हे होते. आज समाजाची मान्यता आहे. शहरी भागात बालविधवांचे प्रमाण आज जवळजवळ नाहीच. विसावे शतक संपतांना आजची महाराष्ट्रीय स्त्री एकंदरीतच पतीपत्नी संबंध,कुटुब संस्था याबद्दल मुळातूनच विचार करू लागलेली दिसते. आजचा विचार आणि एकोणिसाव्या शतकातील विचार यामध्ये तेवढ्या बाबतीत फारफार फरक पडलेला दिसतो हे सांगायला कोणा ज्योतीषाची आवश्यकता नाही.

**निष्कर्ष**

१) या शोधनिबंधात आपण प्राचीन, मध्ययुगीन, शिवशाही,पेशवाई आणि स्वात्तत्रोत्तर कालखंड, महर्षी धोंडो केशव कर्वे, महाराष्ट्रातील विधवा पुनर्विवाह, धोंडो केशव कर्वे यांचा विदुर-विधवा पुनर्विवाह, पुनर्विवाहाचे परिणाम, धोंडो केशव कर्वे यांचे महत्कार्य या क्रमाने मांडणी केली आहे. तसा हा विषय खूप व्यापक असून पुढील अभ्यासकांना संशोधन करण्यासाठी संधी आहे. या सबंधी मराठी साहित्या मध्ये अनेक कादंबऱ्या व नाटके आदी उपलब्ध आहे.

२) जगात आणि भारतात शेतीचा शोध हा स्त्री नेच लावला असून सुरुवातीला मातृसत्ता कपद्धतीच अस्तित्वात होती. पण पुढे पितृसत्ताक पद्धती अस्तित्वात आली. आणि स्त्री ची गुलामी सुरु झाली.

३) धर्म,शास्त्र आणि त्या त्या काळातील स्मृतीकारांनी स्त्रीला दुय्यम ठरवून तिला अस्तित्व हीन केले. विशेषतः मनुस्मृती.

४) पण असे असले तरी त्या त्या वेळच्या धर्म व समाज सुधारकांच्या कृतीकार्या मुळे स्त्री ला न्याय मिळत गेला त्यात महात्मा फुले, आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतरत्न धोंडो केशव कर्वे यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल.

५) विवाह हा महत्वाचा संस्कार असल्यामुळे जसा पुरुषाचा सर्वांगाने विकास साधला जातो तसाच स्त्रीचा ही झाला तर आज जे चित्र स्त्री चे दिसते आहे ते पूर्वी दिसले नसते. आज बालविवाह बंदी आहे, विधवा पुनर्विवाहाला बंदी नाही, विवाह वयाचा कायदा अस्तित्वात आहे. स्त्री-पुरुष समानत आहे.

६) आज विधवा विवाहाला संमती असून विधवांसाठी शासनाने कायदे करून त्यांची पाठराखण केली आहे.

७) भारतरत्न धोंडो केशव कर्वे यांचे वेगळेपण हे आहे की, ते इतर सुधारकांसारखे विदुर –विधवा पुनर्विवाह करून थांबले नाहीत. तर समाजाला समजून घेत,समाजाला न दुखवता विधवा पुनर्विवाहाचे, विधवा शिक्षणाचे व स्त्री उद्धाराचे काम करत राहिले. आणि म्हणूनच आज आपण विधवांच्या प्रश्न, समस्यांवर हे दोन दिवसांचे राष्ट्रीय चर्चासत्र घेऊन चर्चा करत आहोत.

**संदर्भ सूची**

१) सामंत मंगला – स्त्री पर्व, सुगावा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती - ८ मार्च २००० पृ-४६
२) गाठाळ एस. एस. – भारतीय स्त्रियांचा इतिहास व स्त्री जीवन /कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती – जुलै २०१३ / पृ-१२
३) तत्रैव पृ-१३
४) तत्रैव पृ-१९
५) तत्रैव पृ-२०
६) तत्रैव पृ-८१
७) तत्रैव पृ-८६
८) तत्रैव पृ-९०
९) खोले विलास –महर्षी धोंडो केशव कर्वे, मॅजेस्टीक पब्लिशिंग हाउस ठाणे,सुधारित दुसरी आवृत्ती ऑक्टोबर२०१५, पृ-२२९.
१०) उपरोक्तपृ-२३
११) कर्वे, धोंडो केशव –पटवर्धन नारायण महादेव,१९५८, धोंडो केशव कर्वे आत्मवृत्त व चरित्र, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था पुणे पृ-४

१२) खोले विलास –महर्षी धोंडो केशव कर्वे, मॅजेस्टीक पब्लिशिंग हाउस ठाणे,सुधारित दुसरी आवृत्ती ऑक्टोबर२०१५, पृ – ६१

१३) तत्रैव पृ- ६४

१४) कर्वे आनंदीबाई-माझे पुराण, केशव ढवळे प्रकाशन मुंबई, १९९८ पृ-२५

१५) तत्रैव पृ- १०

१६) तत्रैव -७६

१७) खोले विलास – महर्षी धोंडो केशव कर्वे, मॅजेस्टीक पब्लिशिंग हाउस ठाणे, सुधारित दुसरी आवृत्ती ऑक्टोबर२०१५, पृ - ७६

१८) रानडे प्रतिभा- स्त्री प्रश्नाची चर्चा :एकोणिसावे शतक, पॉप्युलर प्रकाशन मुंबई दुसरी आवृत्ती १९९२/१९९४ पृ-२६२

१९) उपरोक्त पृ-७८

२०) उपरोक्त पृ-२७०

२१) उपरोक्त पृ- २८२

२२) कर्वे, धोंडो केशव –पटवर्धन नारायण महादेव,१९५८, धोंडो केशव कर्वे आत्मवृत्त व चरित्र, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था पुणे पृ-१३४

२३) तत्रैव पृ-१३५

२४) तत्रैव पृ-१३५

२५) खोले विलास – महर्षी धोंडो केशव कर्वे, मॅजेस्टीक पब्लिशिंग हाउस ठाणे, सुधारित दुसरी आवृत्ती ऑक्टोबर२०१५, पृ –२३१

**Cite This Article:**

प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन, *(2022)*. विधवापुनर्विवाह आणि भारतरत्न धोंडो केशव कर्वे यांचे कार्य, ***Electronic International Interdisciplinary Research Journal***, *XI (III) May-June, 76-84.*